# कोकणातील आठ किनाऱ्यांवर बीच शॅक्स

## रत्नागिरी जिल्ह्यातील आरे- वारेसह गुहागर समुद्रकिनाऱ्यांचा समावेश

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एमटीडीसी) प्रस्तावनुसार कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर या चार जिल्ह्यातील ८ समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटनाला चालना देण्यासाठी समुद्रकुटी उभारण्याला मान्यता देण्यात आली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तारकर्ली, कुणकेश्वर रत्नागिरी जिल्ह्यातील आरे-वारे, गुहागर, रायगडमधील दिवेआगार, वर्सेली आणि पालघर जिल्ह्यातील बोर्डी, केळवा या आठ समुद्रकिनाऱ्यावर समुद्रकुटी (बीच शॅक्स) उभारण्यात येणार आहेत.

कोकणाच्या सौंदर्यकरणात समुद्राने मोठी भर घातली आहे. ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा कोकण किनारपट्टीला लागला आहे. देश विदेशातील पर्यटना कोकणची किनारपट्टी भुरळ घालत आली आहे. स्वच्छ सुंदर आणि शांतता पूर्व परिसर हा येथील वैशिष्ट्यपूर्ण मानला जातो. पर्यटनाच्या दृष्टीने ही किनारपट्टी महत्त्वाची आहे. त्यामुळे कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तारकर्ली, कुणकेश्वर रत्नागिरी जिल्ह्यातील आरेवारे, गुहागर, रायगडमधील दिवेआगार, वर्सेली आणि पालघर जिल्ह्यातील बोर्डी, केळवा या आठ ठिकाणी ही योजना अमलात आणली जाणार आहे.

कोकणाला समृध्द किनारपट्टी लाभली आहे. या सागर किनारपट्टीचा पर्यटनात्मक व्यावसायिक वापर करण्यासाठी गोव्याच्या धर्तीवर पर्यटन योजनांची अंमलबजावणी करण्याची मागणी एमटीडीसीने केली होती. ही योजना राबविताना पर्यावरणाला पूरक सुविधा आणि योजनांचा वापर करण्यात यावा, असे प्रस्तावित करण्यात आले होते. तसेच या सुविधांबरोबर रोजगारांच्या संधीही उपसब्ध करुन देण्यात येणार होती. त्यानुसार स्थानिक रहिवाशांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने बीस शॅक्स उभारणी होणार आहे. स्थानिक व्यक्तींना यात ८० टक्के जागा राखीव असतील. या कुट्यांचे ३ वर्षाकरिता वाटप केले जाईल. किमान १५ फुटाची लांबी आणि रुंदी तसेच १२ फूट उंचीची ही कुटी असणार आहे. प्रत्येक कुटीमध्ये बसण्यासाठी २० फूट छत टाकता येईल, अशी व्यवस्था असेल. सकाळी ७ वाजेपासून सायंकाळी ७ वाजेपर्यंत या कुटी सुरू ठेवण्यास मान्यता असेल.या परवानगीसाठी लाभार्थ्यांना १५ हजार रुपयांचा निधी ना परतावा तत्त्वावर घेण्यात येणार आहे.

### 'ग्लास बॉटम बोटी'ची पर्यटकांना भुरळ

जिल्ह्याची पर्यटन राजधानी असलेल्या मालवणात पर्यटकांना नवे काहीतरी देण्याचा प्रयत्न येथील पर्यटन व्यावसायिकांकडून नेहमीच केला जातो. याच धर्तीवर 'ग्लास बॉटम बोट' ही अनोखी सागरी पर्यटन संकल्पना चिवला बीच वॉटर स्पोर्टस्च्या माध्यमातून स्थानिक व्यावसायिकांनी साकारली आहे. समुद्र तळाशी असलेल्या सागरी सौंदर्याचा खजिना विविध प्रजातीचे मासे, शंख, शिंपले, प्रवाळ व कोरल ग्लास बॉटम बोटमध्ये बसूनच पर्यटकांना पाहता येणार आहेत. नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच ही बोट पर्यटकांच्या सेवेत दाखल झाली असून पर्यटकांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# 'आरजीपीपीएल'मधून वीजनिर्मिती

## गुहागरमध्ये ७०० मेगावॅट वीजनिर्मितीला प्रारंभ

**गुहागर : पुढारी वृत्तसेवा**

गॅसच्या वाढलेल्या किमती आणि विजेची मागणी नसल्याने बंद पडलेला गुहागर तालुक्यातील रत्नागिरी गॅस आणि वीज प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. परंतु, राज्य किंवा केंद्र सरकारकडून अद्यापही म्हणावा तसा प्रतिसाद मिळालेला नाही. दरम्यान, येथील प्रकल्प व्यवस्थापन विजेच्या मागणीनुसार वीजनिर्मिती करीत आहे. सोमवारपासून प्रकल्पातून ७०० मेगावॉट वीजनिर्मिती सुरू आहे. ही वीजनिर्मिती तीन दिवस चालणार आहे.

तालुक्यातील अंजनवेल या ठिकाणी उभारण्यात आलेला एन्रॉनचा दाभोळ वीज प्रकल्प आणि आताचा रत्नागिरी गॅस आणि वीज प्रकल्प १९९५ साली सत्तेवर आलेल्या शिवसेना-भाजप युतीच्या काळात वादग्रस्त ठरला होता. सध्या एनटीपीसी या कंपनीतील प्रमुख भागधारक आहे, तर राज्य वीज कंपनीचे भागभांडवल खूपच कमी आहे. गॅसवर चालणारा हा प्रकल्प देशातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. किफायतशीर दराने अखंडित गॅस पुरवठा झाल्यास या प्रकल्पातून कमी दराने वीजनिर्मिती होऊ शकते. त्यासाठीच केंद्राकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

एकीकडे विजेची वाढती मागणी आणि दुसरीकडे कोळशाचा तुटवडा लक्षात घेता नैसर्गिक वायूवरील हा प्रकल्प सुरू करणे योग्य राहील, असे केंद्रीय ऊर्जा विभागाचेही मत आहे. याबाबत केंद्रीय ऊर्जामंत्री आर. के. सिंग यांच्या अध्यक्षतेखाली देशातील गॅस आधारित वीज प्रकल्पांशी संबंधित एक बैठकही काही महिन्यांपूर्वी पार पडली होती.

वीज दरवाढीमुळे तत्कालीन फडणवीस सरकारने प्रकल्पातून वीज घेणे बंद केले होते. त्या नंतर कंपनीने रेल्वेबरोबर ५०० मेगावॉटचा करार करून प्रकल्प सुरू ठेवला. सरकारने नैसर्गिक वायूवरील अनुदान बंद केल्याने वीजनिर्मिती महागडी झाली. परिणामी रेल्वेबरोबरचा करारही संपुष्टात आला. महागड्या दरामुळे नवीन वीज खरेदी करार झाला नाही. भाजप-शिवसेना युतीच्या काळात एन्रॉन नावाने वादग्रस्त ठरलेल्या या प्रकल्पात आतापर्यंत अनेक विघ्ने आली आहेत. आधी दाभोळ वीज प्रकल्प हे नाव असलेला हा प्रकल्प आता रत्नागिरी वीज प्रकल्प नावाने ओळखला जातो.

दरम्यान, ऑगस्ट २०२२ पासून प्रकल्पातून एकही युनिट वीज निर्मिती होत नाही.

आमच्या संस्थेच्या मराठी माध्यमाच्या शाळेतील जुने शैक्षणिक साहित्य उदा. बाके, फळे, कपाटे स्क्रॅपमध्ये काढत आहोत. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा. -
**श्री. अनिल जोशी**
**मो. 9821347285**

# साखरप्यात तरुणावर तलवारीने वार

## तिघे जखमी ; घटनेनंतर परिसरात तणाव; बाजारपेठ बंद ठेवून हल्ल्याचा निषेध

**साखरपा : पुढारी वृत्तसेवा**

कबड्डी स्पर्धेच्या ठिकांणी झालेल्या वादातून भडकंबा येथील तरुणावर तलवारीने वार करून त्याला जखमी केल्याची घटना मंगळवारी रात्री घडली. या हल्ल्याविरोधात बाजारपेठ बंद ठेवत निषेध व्यक्त करण्यात आला. हल्लेखोरांना तातडीने अटक करावी, अशी मागणी जोर धरत आहे. या घटनेनंतर गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

साखरपा येथील छ. शिवाजी महाराज पुतळ्याजवळ कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी भडकंबा येथील युवक सागर वैद्य (२३) याची सुशांत सुर्वे नामक युवकाशी बाचाबाची झाली. त्या रागातून सुशांत सुर्वे आणि त्याचे वडील संजय सुर्वे यांनी सागर वैद्य यांच्यावर तलवारीने वार केले. त्यात सागर वैद्य, कौस्तुभ जेधे तसेच देवेंद्र हातणकर हे जखमी झाले. त्यांना साखरपा प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करून रत्नागिरी येथे अधिक उपचारार्थ हलवण्यात आले आहे. या हल्ल्यानंतर सुर्वे पिता-पुत्र फरार झाले आहेत.

दरम्यान, या प्रकारामुळे साखरपा, भडकंबा, कोंडगाव पसिरात मोठा तणाव निर्माण झाला आहे. साखरप्यात एस आर पी ची तुकडी तैनात करण्यात आली आहे. या हल्ल्याचा निषेध म्हणून साखरपा बाजारपेठ कडकडीत बंद ठेवण्यात आली होती. तसेच निषेध मोर्च्याचे आयोजनही करण्यात आले होते. आरोपींवर गुन्हा दाखल आहे.

# भरणेत अपघात

**खेड :** मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावरील भरणे नाका येथील उड्डाणपुलाजवळ मुंबईहून गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने स्वप्नील संजय भाटकर (४०, रा. शिरवली ता. खेड जि रत्नागिरी) यांचा मृत्यू झाला तर विनोद वसंत जाधव (४२) हे जखमी झाले असून कळंबणीच्या उपजिल्हा रूग्णालयात उपचारार्थ दाखल केले.

**प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, एन विभाग, मुंबई.**
**कक्ष क्रमांक ३११, तिसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई – ४०० ६१४.**

**जाहीर निवडणूक प्रकटन**

**जनता सहकारी को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.**, आमीनाबाई, साईनाथ नगर रोड, गणेश नगर, घाटकोपर (प), मुंबई-४०० ०८६ या संस्थेचा सन २०२३ ते २०२८ या कालावधीसाठी तपशिलवार निवडणुक कार्यक्रम **दिनांक २०/०४/२०२३** पासुन जाहीर करीत आहे. सदर कार्यक्रमाची प्रत प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, एन विभाग मुंबई, कक्ष क्रमांक ३११, ३ रा मजला, कोकण भवन, नवी मुंबई-४००६१४ या ठिकाणी व निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात तसेच संस्थेच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यांत आलेला आहे, याची संस्थेच्या सभासदांनी नोंद घ्यावी.

सही/-
(श्रीम. ज्योती मोहिते)
निवडणूक निर्णय अधिकारी,
जनता सहकारी को-ऑप. क्रेडिट सोसा. लि.
घाटकोपर (प.), मुंबई-४०० ०८६

शिक्का

दिनांक : १८/०४/२०२३

**SBI भारतीय स्टेट बैंक State Bank of India** महाड शाखा (००४१५) महाड, जि. रायगड - ४०२३०१.

**(नियम ८(९) प्रत्यक्ष ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)**

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरितांनी स्टेट बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी म्हणून, सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे अनुच्छेद १३ (१२) सहवाचन नियम ३ अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जदार **श्री. विश्वास गेनू पवार व श्रीमती कल्पना विश्वास पवार (खाते क्र. ३७९७३१९८३६४, ३८३४७१३९९५८)** यांना संबंधित सूचनेत निर्देशित रक्कम **दि. १८.११.२०२२ रोजीनुसार रु. २४,९५,८२७.०० (रु. चोवीस लाख पंचाण्णव हजार आठशे सत्तावीस मात्र)** अधिक पुढील व्याज, मूल्य, प्रभार आदी रकमेचे प्रदान संबंधित सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्याचे निर्देश देणारी मागणी सूचना **दि. १८.११.२०२२** जारी केली होती.

कर्जदारांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना याद्वारे कर्जदार/हमीदारांना व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर कायद्याच्या सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, अनुच्छेद १३ (४) सहवाचन सदर नियमाच्या नियम ८ व ९ अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये **श्री. विश्वास गेनू पवार व श्रीमती कल्पना विश्वास पवार** यांच्या मालकीच्या खालील **विवरणीत निर्देशित मालमत्तेचा दि. १७.०४.२०२३ रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.**

विशेषत: कर्जदार/हमीदारांना व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्ता व कोणत्याही मालम त्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या प्रभारांतर्गत रक्कम **रु.२४,९५,८२७.०० अधिक पुढील व्याज, मूल्य, इतर खर्च आदी रकमेच्या अधीन असतील.**

कायद्याच्या अनुच्छेद १३ च्या उपअनुच्छेद (८) च्या तरतुदींअंतर्गत कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे की त्यांनी उपलब्ध वेळेमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घ्यावी.

**स्थावर मालमत्तेचे विवरण**

फ्लॅट क्र. ३०१, ३ रा मजला, चंद्ररोहिणी अपार्टमेंट नावाने ज्ञात इमारतीतील, सीटीएस क्र. १५९६, सर्व्हे क्र. ११९/३ए, ३सी, ३ डी, ३ई, काकरतळे, महाड महापालिका हद्दीतील, तालुका महाड, जिल्हा रायगड येथील.

**दिनांक : १७.०४.२०२३ ठिकाण : महाड** **प्राधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया**

# रत्नागिरी मेडिकल कॉलेजचे काम गतिमान

## नॅशनल मेडिकल कौन्सिल टीम पडताळणी करणार

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांचा मेडिकल वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीसाठी सातत्याने पाठपुरावा झाल्याने अखेर या २०२३ वर्षात जिल्ह्यातील मेडिकल कॉलेज स्वप्न साकार होत आहे. संबंधित सर्व यंत्रणा ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कामाला लागली असून, नॅशनल मेडिकल कौन्सिलची टीम पुन्हा २ महिन्यांनी याची पूर्तता झाली की नाही, याची पडताळणी करण्यासाठी येणार आहे.

महिन्यापूर्वी दिल्ली येथील नॅशनल मेडिकल काऊन्सिलची वैद्यकीय अधिकाऱ्यांची टीम मेडिकल कॉलेजच्या जागेची पाहणी आणि इतर बाबींची पूर्तता व्हावी, यासाठी बैठकही घेतली. येथील महिला रुग्णालयाचा काही भाग हा मेडिकल कॉलेजच्या कामकाजासाठी वापरण्यात येणार आहे. या शिवाय मनोरुग्णालय, सिव्हिल हॉस्पिटलची या टीमने पाहणी केली. पुढील तीन तीन महिन्यात या मेडिकल कॉलेजच्या प्रक्रियेची अंमलबजावणी व्हावी, यासाठी सूचना या वैद्यकीय अधिकारी टीमने केली आहे. आता २ महिन्यांनी ही टीम पुन्हा येणार आहे. त्यामुळे संपूर्ण यंत्रणा या मेडिकल कॉलेजच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा करत आहे.

**पश्चिम रेल्वे द्वारे वांद्रे टर्मिनस – गांधीधाम दरम्यान उन्हाळी विशेष सुपरफास्ट गाडी**

| गाडी क्र. | प्रस्थान आणि आगमन स्थानक | सेवांची तारीख | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|---|---|
| ०९४१५ | वांद्रे टर्मिनस - गांधीधाम | २७/०४/२०२३ पासून २९/०६/२०२३ पर्यंत | १५.५० वा. (गुरुवार) | ०४.१५ वा. (दुसऱ्या दिवशी) |
| ०९४१६ | गांधीधाम - वांद्रे टर्मिनस | २७/०४/२०२३ पासून २९/०६/२०२३ पर्यंत | ००.३० वा. (गुरुवार) | १३.०५ वा. (त्याच दिवशी) |

**थांबे:** बोरीवली, वापी, सुरत, वडोदरा, अहमदाबाद, विरमगाम, ध्रांगध्रा, सामाख्याली आणि भरूच स्थानक दोन्ही दिशेने.

**संरचना:** एसी २-टीयर, एसी ३-टीयर, शयनयान श्रेणी आणि सामान्य द्वितीय श्रेणी कोचेस.

थांबण्याच्या वेळा आणि संरचना यासंबंधी तपशीलवार माहितीसाठी, प्रवासी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट देऊ शकतात.

गाडी क्र. ०९४१५/०९४१६ चे आरक्षण दि. २१/०४/२०२३ पासून सर्व पीआरएस काउंटरवर आणि आयआरसीटीसी वेबसाइटवर सुरु होईल. वरील गाडी विशेष भाड्यावर विशेष गाडी म्हणून धावेल.

**पश्चिम रेल्वे** www.wr.indianrailways.gov.in
आम्हाला लाइक करा: facebook.com/WesternRly
आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly

कृपया सर्व आरक्षित तिकिटांसाठी मूळ वैध पुरावा जवळ ठेवा.

**पुणे ⇌ गोरखपूर दरम्यान १८ अतिरिक्त उन्हाळी विशेष ट्रेन**

| ट्रेन क्र. | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|
| ०१४३१ | पुणे दर शुक्रवार १६.१५ वाजता दिनांक २१.०४.२०२३ ते १६.०६.२०२३ पर्यंत. | गोरखपुर दुसऱ्या दिवशी २१.०० वाजता |
| ०१४३२ | गोरखपुर दर शनिवार २३.२५ वाजता दिनांक २२.०४.२०२३ ते १७.०६.२०२३ पर्यंत. | पुणे तीसऱ्या दिवशी ०७.१५ वाजता |

**थांबे:** दौड कॉर्ड लाइन, अहमदनगर, बेलापुर, कोपरगांव, मनमाड, भुसावळ, खंडवा जंक्शन, इटारसी, भोपाल, बीना, वीरांगना लक्ष्मीबाई जंक्शन, उरई, कानपुर सेंट्रल, लखनऊ, गोंडा, मानकापुर, बस्ती और खलीलाबाद

**संरचना:** एक द्वितीय वातानुकूलित,४ तृतीय वातानुकूलित, ११ शयनयान आणि ६ सामान्य द्वितीय श्रेणी दोन गार्ड्स ब्रेक व्हॅनसह.

**आरक्षण**

२०.०४.२०२३ रोजी संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि **www.irctc.co.in** या वेबसाइटवर विशेष शुल्कावर विशेष ट्रेन क्रमांक ०१४३१ साठी बुकिंग सुरू होईल. वरील ट्रेनचे सर्वसाधारण द्वितीय श्रेणीचे डबे अनारक्षित डबे म्हणून धावतील.

इस स्पेशल ट्रेनों के ठहराव के विस्तृत समय के लिए कृपया http://www.enquiry.indianrail.gov.in पर जाएं NTES ऐप डाउनलोड करें।

*प्रवाशांना स्वत:च्या आणि इतरांच्या सुरक्षिततेसाठी कोविड योग्य वर्तनाचे पालन करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.*

**मध्य रेल्वे** www.cr.indianrailways.gov.in

रेलमदद हेल्पलाईन 139 centralrailwayindia Central_Railway

# चिपळूणमध्ये ट्रक-डंपर अपघातात एक ठार

**चिपळूण : पुढारी वृत्तसेवा**

चिपळूण-कराड मार्गावर दहाचाकी मालवाहू ट्रक व डंपर यांच्यात झालेल्या भीषण अपघातात कराड येथील डंपर चालक सुनील डीपले जागीच ठार झाला तर ट्रक चालक दादा पीर गंभीररित्या जखमी झाला. त्यांच्यावर लाईफ केअर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या अपघातामुळे चिपळूण-कराड मार्गावरील वाहतूक सुमारे दोन ते तीन तास विस्कळीत झाली होती. मात्र चिपळूण पोलिसांनी क्रेनच्या माध्यमातून दोन्ही वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

चिपळूण तालुक्यातील पिंपळी येथील कॅनॉलच्या पुलावर हा भीषण अपघात मंगळवारी सायंकाळी ७ च्या दरम्यान झाला. उंब्रज येथून निघालेला डंपर खेड मधील लोटे येथे जात होता. मात्र पिंपळी येथील कॅनॉलवरील पुलावर वेगात असलेल्या डंपर आणि दहा चाकी ट्रकची समोरासमोर जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की डंपर चालक केबिनमध्ये अडकून पडला होता. यामध्ये दोन्ही वाहनांच्या दर्शनी भागाचा चक्काचूर झाला. अपघाताचे वृत्त समजताच अनेकांनी घटनास्थळी धाव घेतली.

**श्री ओमकार एस.आर.ए. को-ऑप हौसिंग सोसायटी लि. पत्ता: गौरीशंकर वाडी न.२, पंतनगर, घाटकोपर (पू), मुंबई – ४०० ०७५**

या संस्थेचे सभासद **कै. श्रीम. जिल्लनदेवी बनारसीलाल पटवा** सदनिका क्र. ४/३०४ यांचे दिनांक २२.११.२०१८ रोजी निधन झाले. त्यांचे पती **कै. श्री. बनारसीलाल बद्रीनाथ पटवा** यांचे या पुर्वीच निधन झाले आहे व तसेच त्यांचा मुलगा **कै. श्री. कन्हैयालाल बनारसीलाल पटवा** यांचे तारीख ०२/०५/१९९० रोजी व मुलगा **कै. श्री. सत्यनारायण बनारसीलाल पटवा** यांचे तारीख ०७/०७/२०२० रोजी निधन झाले आहे. **कै. श्री. सत्यनारायण बनारसीलाल पटवा** यांनी लग्न केले नव्हते. **कै. श्री. कन्हैयालाल बनारसीलाल पटवा** यांची पत्नी **कै. श्रीम. मंजूदेवी कन्हैयालाल पटवा** यांचेही १६/०१/२०१२ रोजी निधन झाले असून वारसदार त्यांचा मुलगा **श्री. राध्येश्याम कन्हैयालाल पटवा** यांनी सदर सदनिका तसेच भाग भांडवल आपल्या नावे हस्तांतरीत करण्यासाठी संस्थेकडे विहित नमुन्यात अर्ज केला आहे. सदरहू मृत सभासदांनी नामनिर्देशित केलेले नाही. संस्था या नोटीसद्वारे, संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सभासदांचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदांचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्या कडुन हक्क मागण्या/हरकती मागवित आहे. हि नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन १४ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतीच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमुद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर असा कोणत्याही हक्क मागण्या/हरकती आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांच्याकडे सांय ७ ते ९ पर्यंत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीसची मुदत संपण्याच्या तारखे पर्यंत उपलब्ध राहील.

**ठिकाण: घाटकोपर मुंबई**
**श्री ओमकार एस.आर.ए. को-ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**सही**

# सिंधुदुर्ग एसटी विभागाच्या ताफ्यात येणार १९६ इलेक्ट्रिक बसेस

## ५ चार्जिंग स्टेशन : नियंत्रक अभिजित पाटील

**कणकवली : पुढारी वृत्तसेवा**

एसटी महामंडळाला मोठ्या प्रमाणावर आवश्यक असलेल्या बसेस, डिझेलचे दिवसेंदिवस वाढणारे दर या बाबी लक्षात घेवून केंद्र शासनाच्या फेम थ्री योजनेच्या माध्यमातून एसटी महामंडळाच्या ताफ्यात ४,५९३ इलेक्ट्रिक बसेस येणार आहेत. यापैकी १९६ इलेक्ट्रिक बसेस सिंधुदुर्ग विभागाला मिळणार आहेत. त्याकरिता कणकवली, सावंतवाडी, कुडाळ, देवगड,वेंगुर्ले या पाच ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारले जाणार आहे. एका वेळेस चार्जिंग केल्यानंतर सुमारे ३५० किमी. चा प्रवास करण्याची क्षमता या बसमध्ये असणार आहे. येत्या दिवाळी पर्यंत या नव्या बसेस दाखल होतील,अशी माहिती सिंधुदुर्ग विभाग नियंत्रक अभिजित पाटील यांनी दिली. त्याचबरोबर २० मिडी, ३० एशियाड आणि ४० मोठ्या अशा अन्य ९० बसेसही सिंधुदुर्ग विभागाला लवकरच मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

२०१७ पासून एसटी महामंडळाच्या ताफ्यात नव्या बसेस आलेल्याच नाहीत. बसेस नसल्यामुळे गाड्यांच्या वेळापत्रकावर आणि एकूणच वाहतूक व्यवस्थेवर होत असलेला परिणाम लक्षात घेवून एसटी महामंडळाच्या ताफ्यात विद्युत प्रणालीवर चालणाऱ्या ४,५९३ बसेस भाडे तत्वावर घेण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली जात आहे. या बसेसच्या परिचालनासाठी आवश्यक जीसीसी आगार व चार्जिंग स्टेशनसकरिता १२७ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. मुंबई रिजनमध्ये ठाणे विभागाला २३०, रत्नागिरीला १३७, सिंधुदुर्ग १९६, मुंबईला २५ आणि रायगडला ४० अशा ६२८ बसेस मिळणार आहेत. त्यामुळे सिंधुदुर्गात १९६ बसेस पैकी सावंतवाडी आगाराला ६१, कणकवली आगाराला ४८, कुडाळ आगाराला ४०, देवगड आगाराला १८ आणि वेंगुर्ले आगाराला २९ बसेस मिळणार आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन आणि पर्यावरण पूरक जिल्हा असल्यामुळे सिंधुदुर्ग विभागाला अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत जादा बसेस मिळणार असल्याचे विभाग नियंत्रक अभिजित पाटील यांनी सांगितले.

या बसेसच्या चार्जिंगसाठी महावितरणमार्फत चार्जिंग स्टेशन जिल्ह्यात चार ठिकाणी होणार आहेत. त्यासाठी लागणारा खर्च एसटी महामंडळ करणार आहे. महामंडळाने महावितरणकडे त्याचे अंदाजपत्रकही मागवले आहे. एक बस चार्जिंग होण्यासाठी ६ तास लागणार आहेत. त्यातून सुमारे ३०० ते ३५० किमी चा प्रवास बस करू शकणार आहे. त्या त्या विभागाला बसेसच्या चार्जिंग स्टेशनकरिता एचटी लाईन उपलब्ध करून देण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

**एल&टी फायनान्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परागणा उत्तर.
**CIN No.:** U65910WB1993FLC060810
**शाखा कार्यालय:** घाटकोपर, मुंबई

L&T Financial Services

**तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव**

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक लिलावाद्वारे''** **''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 12.04.2023 नुसार (रुपयांमध्ये) | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. मगधा क्रिएटिव्ह मर्चंट एलएलपी 2. रमेश पारस सिंह 3. रुचीश नरेंद्र पटेल | मालमत्तेचा पत्ता : फ्लॅट क्र. पी1 – 2103 अधिमापन 627 चौ.फू. (चटई क्षेत्रफळ), 21वा मजला, इमारत 'प्रॉमेनेड', आर सिटी मॉल समोर, एलबीएस मार्ग, विक्रोळी, घाटकोपर मुंबई महाराष्ट्र मुंबई (उपनगर) सोबत इमारतीमधील एक कार पार्किंगची जागा : सीमारेषा : पूर्व – रेल्वे मार्ग; पश्चिम – सीबीएस मार्ग; उत्तर – गोदरेज कंपनी; दक्षिण – प्रेसिडेन्शिअल टॉवर | MUMHL16001306/ MUMHL16001521 | 3 एप्रिल 2023 | रु. 13,68,304/- | रु. 2,67,78,595.04/- | रु. 1,36,83,040/- | 16/05/2023 | 22/05/2023 |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **20/05/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **22/05/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **23/05/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात **ज्याचे नाव : प्रशांत पाटील, एल अँड टी फायनान्स लि. – ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, क